# महावितरण
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र शासन (उपक्रम)

CIN : U40109MH200SSGC153645

दुरध्वनी क्र. : २६४७४२११/२६४७२१३१
वि.क्र. ३६२४
Website : www.mahadiscom.in
E-mail : dccell@mahadiscom.in

शिस्तभंग कारवाई कक्ष
"प्रकाशगड", ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.


क्र. मासं/शिनि-२/ 0378 दिनांक : 13 MAY 2016

**परिपत्रक**

विषय : कर्मचाऱ्यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी रहाणेबाबत

संदर्भ : १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८५ दि. २९/०३/२००३
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. १०६ दि. १०/०५/२००७
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३३७ दि. ०२/०५/२०११
४) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५०१ दि. २१/०२/२०१५
५) परिपत्रक पत्र क्र. HR/HRMS/२४३७६ दि. २८/०५/२०१५
६) परिपत्रक पत्र क्र. HRD/O & M/F.No.८९०/३५३२४ दि. ३०/०९/२०१५

ग्राहकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याकरीता व अचानकपणे उदभवणाऱ्या अडचणीचा निपटारा करण्याकरीता क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी त्यांचे मुख्यालयाचे ठिकाणी रहाणे बंधनकारक आहे. याबाबत, मुख्य कार्यालयात झालेल्या मुख्य अभियंता यांचे आढावा बैठकीमध्ये वेळोवळी सूचना देण्यात आल्या आहेत. परंतू याबाबत ठोस कारवाई झालेली नाही.

महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणेबाबत आणि मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द म.रा.वि.वि.कं कर्मचारी सेवाविनियम क्र.८६ अंतर्गत कारवाई करणेबाबत सुचना यापूर्वी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापी व्यवस्थापनाच्या असे निदर्शनास आले आहे की, क्षेत्रीय कार्यालयातील विभाग प्रमुखाकडून या प्रकरणी प्रभावीपणे आढावा घेतला जात नाही, तसेच दोषी कर्मचाऱ्यांवर तत्परतेन व गांभिर्याने कारवाई होत नाही.

कर्मचाऱ्यांनी मुख्यालयात रहाणेबाबत यापूर्वी दिलेल्या सूचनांची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी, याकरीता मुख्य अभियंता आणि अधिक्षक अभियंता हे त्यांच्या अधिनस्थ कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा/तपासणी करतील त्याप्रसंगी कर्मचारी मुख्यालयात राहतात का याची तपासणी आवर्जून करतील.

सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांना याद्वारे सुचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्थ क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांबाबत कार्यालयीन वेळेनंतर व सुटटीच्या दिवशी कर्मचाऱ्यांच्या घोषित केलेल्या मुख्यालयाची तपासणी करुन कसूरदार कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंग कारवाई करावी. या प्रकरणी प्रत्येक अधिक्षक अभियंता यांनी त्यांच्या मंडळातील सर्व कर्मचाऱ्यांसंदर्भात अशा प्रकरणी तपासणी करण्यासाठी पथकांची नेमणूक करावी. सदर पथकाने सुटीच्या दिवशी व कार्यालयीन वेळेनंतर विशिष्ट शाखा / उपविभागातील कर्मचाऱ्यांच्या घोषीत निवास स्थानांना भेट देऊन ते मुख्यालयात राहतात का याची पडताळणी करावी. या संदर्भातील अहवालानुसार तात्काळ शिस्तभंगाविषयक कारवाई करण्यात यावी. तसेच पथकांमार्फत व्यवस्थित कामकाज होत

असल्याची पडताळणी करावी. या संदर्भात कसूरदार अधिकाऱ्यांविरूध्द शिस्तभंगाविषयक कारवाई करण्यात येईल याची नोंद द्यावी.

सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये सर्व कार्यालयाची माहिती भरून सदरची माहिती परिमंडळ स्तरावर संकलित करुन मुख्य कार्यालयास प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत पाठविण्यात यावी.

सर्व विभाग, मंडल व परिमंडल कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात येते की, कर्मचाऱ्यांच्या मुख्यालयात रहाणेबाबतच्या सर्व सूचनांची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

सदरचे परिपत्रक कंपनीच्या R-APDRP पोर्टल वर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

13.5.2016

(नीलेश गटणे)
कार्यकारी संचालक (मासं)

C\Documents and setting\Sangita\My Documents\Kulkarni\Revised Head Quarter-1.doc

अ ) चालू महिन्यासाठी

**मुख्यालयात न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर केलेल्या कारवाईची माहिती      दिनांक      रोजीची स्थिती**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | कार्यरत कर्मचाऱ्यांची वेतन गट निहाय संख्या | | | | | मुख्यालयात राहत नसलेल्या कर्मचाऱ्यांची वेतन गट निहाय संख्या | | | | | घरभाडे भत्ता थांबविण्यात आला अशा कर्मचाऱ्यांची संख्या | | मुख्यालयात रहात नसले प्रकरणी शिस्तभंग कारवाई केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | एकूण | १ | २ | ३ | ४ | एकूण | कर्मचाऱ्यांची संख्या | कपात केलेली एकूण रक्कम | स्पष्टीकरण मागविले | आरोपपत्र दिले | शिस्तभंग कारवाईची दाखवा नोटीस बजावली | कारवाई करण्याची आवश्यता नाही असे आदेश निर्गमित केले. | |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | | | | |

टिप :-

1) नियुक्त केलेल्या तपासणी पथकांची संख्या

2) तपासणी पथकांचे मार्फत मागील महिन्यांत केलेल्या तपासण्यांची संख्या

3) अ.क्र. २ मधील तपासणी मध्ये आढळलेल्या मुख्यालयात न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या

तपासणी अधिकाऱ्यांचे
नाव/पदनाम/स्वाक्षरी

स्थळ:

दिनांक:-

ब ) संचयीत माहिती

**मुख्यालयात न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर केलेल्या कारवाईची माहिती - (१ एप्रिल २०१६ ते ------------) परिमंडळाचे नाव : --**

| अ.क्र. | कार्यरत कर्मचाऱ्यांची वेतन गट निहाय संख्या | | | | | मुख्यालयात राहत नसलेल्या कर्मचाऱ्यांची वेतन गट निहाय संख्या | | | | | घरभाडे भत्ता थांबविण्यात आला | | मुख्यालयात रहात नसले प्रकरणी शिस्तभंग कारवाई केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | एकूण | १ | २ | ३ | ४ | एकूण | कर्मचाऱ्यांची संख्या | एकूण रक्कम | स्पष्टीकरण मागविले | आरोपपत्र दिले | शिस्तभंग कारवाईची दाखवा नोटीस बजावली | कारवाई करण्याची आवश्यता नाही असे आदेश निर्गमित केले. | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

* टिप :- माहिती सादर करताना मागील महिन्यात सादर केलेल्या माहितीचा (मुख्यालयात राहत नसलेल्या व कारवाई केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या) समावेश करुन माहिती सादर करावी.